CMYK

## दौंडमधून विसर्ग वाढला; उजनी अर्धशतकाकडे

सोलापूर : दौंडमधून उजनीत येणारा विसर्ग सोमवारी पुन्हा वाढला आहे. त्यामुळे उजनीची वाटचाल अर्धशतकाकडे सुरू झाली आहे.

रविवारी दौंडमधून केवळ १८ हजार क्युसेक्सचा विसर्ग येत होता.त्यामुळे उजनी ५० टक्के तरी भरेल की नाही,याविषयी शंका व्यक्त केली जात होती मात्र,रविवारी पुण्यातील खडकवासला धरणातून मुठा नदीत पुन्हा विसर्ग वाढवण्यात आला आहे. हे पाणी थेट भीमा नदीत येत असते.त्यामुळे दौंडमधून विसर्ग वाढला आहे.सोमवारी सायंकाळी ६वाजण्याच्या माहितीनुसार दौंडमधून २१ हजार क्युसेकचा विसर्ग येत होता.धरणातील पाण्याची पातळी प्लस४२ टक्के झाली आहे.



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर


सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## शांतीनगर येथे युवकाचा गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर : सोलापूर -एका २७ वर्षीय तरुणाने दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना मजरेवाडी परिसरातील शांतीनगर येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. कृष्णा संजय बिराजदार (वय २७ रा. शांतीनगर) असे जखमीचे नाव आहे. त्याने सोमवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास नशेत घरातील छताच्या लाकडी वाशाला ओढणीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून अनुराधा (आई) यांनी शासकीय रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत दाखल केले. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. ३० जुलै २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : ३०१ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

# मालकांनी अखेर ‘शड्डू’ ठोकले, ‘दक्षिण’च्याच मैदानात उतरले



## ▌बाशिंग बांधलेल्या अन्य इच्छुकांचे धाबे दणाणले

उत्तर सोलापूर/प्रतिनिधी

**माजी आमदार दिलीप माने यांनी आगामी विधानसभा निवडणूक काँग्रेस पक्षाकडून दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघातूनच लढवण्याचा निर्धार पक्का करून टाकला आहे.त्यामुळे दक्षिणच्या राजकारणाला वेगळी कलाटणी मिळण्याची दाट शक्यता आहे. सोमवारी झालेल्या एक महत्वपूर्ण बैठकीत दिलीपमालकांनी लढाईचे शिवधनुष्य उचलले आणि मैदानात उतरण्याचा निर्धार केला. त्यांच्या या निर्णयाने काँग्रेस श्रेष्ठी काय निर्णय घेतात हे आता महत्वाचे ठरणार आहे तसेच अन्य इच्छुकांचे धाबे दणाणले आहे.**

दक्षिणची जागा काँग्रेससाठी अत्यंत प्रतिष्ठेची आहे. स्वातंत्र्यानंतर कित्येक वर्ष इथल्या मतदारांनी काँग्रेसची पाठराखण केली आहे.माने यांनी एकदा ही जागा जिंकून ही प्रतिष्ठा पुन्हा काँग्रेसला मिळवून दिली होती.त्या अगोदर शिवसेनेने ही जागा जिंकली होती.माने यांच्यानंतर भाजप नेते तथा विद्यमान आमदार सुभाषबापू देशमुख यांनी काँग्रेसला खिंडार पाडत ही जागा दोनदा जिंकली.

यावेळेसही सुभाषबापू हेच भाजपकडून इच्छुक आहेत तर त्यांना अस्मान दाखवण्यासाठी काँग्रेसकडून ताकतवान उमेदवार शोधला जात आहे. दरम्यान काँग्रेसकडून याठिकाणी गतवेळचे उमेदवार बाबा मिस्त्री, सीना-भीमा खोऱ्यातील नेते सुरेश हसापुरे, एम.के. फौंडेशनचे संस्थापक महादेव कोगनुरे हे इच्छुक आहेत. त्यांनी दक्षिणवर प्रबळ दावा सांगितला आहे. दिलीपमालकांनी दक्षिणचीच तयारी सुरू केली होती पण त्यांनी स्पष्टपणे आपला पत्ता ओपन केलेला नव्हता.आता त्यांची भूमिका उघड झाल्याने उमेदवारी देण्याच्या सारीपटावरचा डाव चांगलाच रंगणार आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी तसेच कार्यकर्त्यांनी रक्ताचे पाणी करत प्रणिती शिंदे यांना निवडून आणण्यात मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे काँग्रेस श्रेष्ठी सुशीलकुमार शिंदे यांच्याकडून या विजयाच्या बक्षिसीची वरमाला उमेदवारीच्या रूपातून कुणाच्या गळ्यात टाकणार याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.

दक्षिण विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी सोलापुरातील ब्रह्मदेवदादा माने बँकेच्या सभागृहात दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आणि सोलापूर शहरमधील नेते आणि कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. त्यात दिलीपमालकांनी आपला इरादा स्पष्ट केला.

सहकार तपस्वी स्व. ब्रम्हदेव दादा माने यांच्यापासून ते आजपर्यंत उत्तर, दक्षिण आणि सोलापूर शहरातील कार्यकर्ते माझ्यासोबत आहेत. त्यांचे आर्शीवाद माझ्या पाठीशी असून कार्यकर्त्यांच्या इच्छेनुसार मी दक्षिण मधूनच काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून आमदारकी लढवणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

पुढे बोलताना ते म्हणाले, लोकसभेला उत्तर, दक्षिण आणि शहरातील जेष्ठ तसेच युवकांनी मिळून काँग्रेसच्या माध्यमातून प्रणिती शिंदे यांना खासदार म्हणून निवडून दिले. हीच ताकत आता विधासभेमध्ये वापरून काँग्रेस पक्षाचे हात पुन्हा बळकट करायचे आहेत. काँग्रेस मधूनच पुन्हा आमदारकी लढवायची असून गावभेटी दौरा चालू करायचा आहे. कार्यकर्त्यांनी पुनः जोमाने कामाला सुरुवात करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

बैठकीला बाळासाहेब पाटील, बाबासाहेब पाटील, माजी उपसभापती संभाजी भडकुंबे, रामचंद्र हक्के, पृथ्वीराज माने, नानासाहेब पवार, बसू सुरवसे, रावसाहेब शिंदे, नामदेव गवळी, बाळासाहेब सुरवसे, दिगंबर मेटे, नागनाथ माने, आप्पाशा काळे, जैनुद्दीन शेख, चंद्रकांत खुपसंगी, गंगाधर बिराजदार, प्रथमेश पाटील, रफिक पठाण, सतीश मस्के, भगवान कदम, सुनील जाधव, अजय सोनटक्के, उमेश भगत, अजय रेवजे, बालाजी यलगुंडे, पांडुरंग बेलभंडारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बालाजी पवार, ओंकार केंगार, ओंकार शिंदे, रफिक पठाण, विकास पाटील, सोमनाथ बचूटे, म्हळाप्पा बंडगर, विशाल भोसले, श्रीकांत बंडगर, सुदर्शन पाटील, शिवाजी पाटील, शिवाजी गुंड, किसन भिंगारे, शहाजी भोसले, रमाकांत चराटे, नंदकुमार पाटील, मारुती इंजिनवारे, बबन जगताप, गोविंद राठोड,प्रवीण राठोड,भीमा पवार, वामन निंबाळकर, नीलकंठ रजपूत, महेश पाटील यांच्यसह उत्तर,दक्षिण आणि शहरातील कार्यकर्ते उपस्थित होते.

### ● तिथे मन रमले नाही...

दिलीप माने हे काँग्रेसचे निष्ठावंत नेते.सहकार तपस्वी ब्रह्मदेवदादा माने यांच्या सामाजिक,राजकीय व सहकार क्षेत्राचा आदर्श घेवून त्यांनी सर्वच क्षेत्रात वाटचाल ठेवली होती.गेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी शिवसेनेचे शिवबंधन हाती बांधून घेतले. त्यासाठी त्यांनी मातोश्री गाठली होती.उद्धव ठाकरे यांनी त्यांना शहर मध्यमधून उमेदवारी दिली.पण ते पराभूत झाले.शिवसेनेत त्यांचे मन रमले नाही.त्यानंतर ते शिवसेनेपासून चार हात लांबच राहिले.

### ● सुभाषबापूंचा श्वास कोंडणार...

सुभाषबापूंना दमछाक करण्यासाठी दिलीप माने हेच तगडे उमेदवार ठरू शकतात. अन्य उमेदवार दिला गेला तर सुभाषबापूंचा मार्ग वन-वे ठरेल तेव्हा दिलीपमालकांचाच विचार व्हावा, असा मतप्रवाह सीना -भीमा खोऱ्यातील नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा होता व आजही आहे.तेव्हा पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात यावरच पुढची रणनीती असेल.यदाकदा दिलीपमालकांचाच विचार झाला तर सुभाषबापूंचा श्वास कोंडला जाईल,असे काँग्रेसजन बोलत आहेत.

“ गेली अनेक वर्षे आपण दादा आणि मालकांसोबत कामे केली आहेत. आता यापुढेही दक्षिणचा आमदार म्हणूनच दिलीप माने यांनी निवडून द्यायचेच. त्यांच्या शिवाय आपले कोणतेही काम होणणार नाही, समस्यां सुटणार नाहीत.

**-सोमनाथ बचुटे**

“ गेल्या १० वर्षांमध्ये सत्ताधारी पक्षाच्या आमदाराने ठराविक लोकांचे कामे केली आहेत. निधी देताना कार्यकर्ता कोणाचा आहे, हे पाहून कामे केली आहेत. त्यामुळे दक्षिणला दिलीपमालकांखेरीज पर्याय नाही.

**-बाळासाहेब सुरवसे सोलापूर**

“ सर्व सामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, रस्ते असे विविध प्रश्न सोडविण्यासाठी अग्रेसर आहेत यापुढे देखील त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक कार्यात एकत्र येऊन दिलीपमालकांना साथ देणार आहोत.

**-कमलाकर भोसले, सोलापूर.**

## पूर्वीच्या भांडणावरून बेरड पूल - सिव्हील येथे दोन गटात कोयता आणि फायटरने मारहाण; ६ जखमी

सोलापूर/प्रतिनिधी

पूर्वीच्या भांडणावरून दोन गटात बेरड पूल आणि शासकीय रुग्णालयाच्या आवारात कोयता, काठी, फायटर आणि लोखंडी गजाने झालेल्या मारहाणीत ६ जण जखमी झाले. ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. सर्व जखमीला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. या प्रकाराम ुळे शासकीय रुग्णालयात गर्दी झाली होती. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांची कुमक मागवण्यात आली होती .

अभिषेक मौलासिंग चौधरी (वय २४ रा. बापूजी नगर ) आणि विनायक प्रकाश मौलावाले (वय १९ रा .बेरड पूल, लष्कर ) अशी पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. दुपारी २ वाजेच्या सुमारास बेरड पूल परिसरातील शितलादेवी मंदिर येथे पूर्वीच्या भांडणावरून कृष्णा राजू जमादार आणि अन्य ५ जणांनी मिळून त्यांना कोयता, काठी आणि लाथा बुक्क्याने मारहाण केली.

तर दुसऱ्या गटातील राजू मोहन जमादार (वय ४५ ), त्याचा मुलगा कृष्णा जमादार (वय १९ दोघे रा.नळबाजार चौक, मुर्गीनाला), सनी राम जमादार (वय १८) आणि दीपक राम जमादार (वय १९ दोघे रा. कुमठा नाका, म



हाराणाप्रताप झोपडपट्टी) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना शासकीय रुग्णालयातील लक्ष्मी मंदिराजवळ पूर्वीच्या भांडणावरून प्रकाश मौलावाले, अमर माने वगैरे ८ जणांनी मिळून लोखंडी गज, फायटर आणि लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यात दीपक जमादार याचे प्रकृती गंभीर आहे .

रविवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास बेरड पूल परिसरातील शितलादेवी मंदिर जवळ पूर्वीच्या भांडणावरून अभिषेक चौधरी आणि विनायक मौलावाले यांना मारहाण झाली होती. त्या दोघांना शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी दुसऱ्या गटातील जमाव रुग्णालयाच्या आवारात आला आणि पुन्हा मारहाणीचा प्रकार घडला. यावेळी रुग्णालयाच्या आवारातच दोन गटातील जमावात हाणामारीचा प्रकार घडला. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांची कुमक मागवण्यात आली होती. त्यावेळी पोलिसांनी सौम्य छडीमार करून जखमींना रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

### रुग्णास नेणारा तरुणही मारहाणीत जखमी

दुपारी तीन वाजेच्या सुमारास रुग्णालयाच्या आवारात मारहाणीचा प्रकार घडत असताना सुनील शिवलाल कांबळे (वय १८ रा.कुमठा नाका) हा तरुण आपल्या वडिलांना उपचारासाठी रुग्णालयात आणत होता. त्यावेळी ओपीडी जवळ त्याला अनोळखी जमावाने मारहाण केल्याने जखमी झाला. त्याला देखील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## मुकुंदनगर येथे चाकूने मारहाण

सोलापूर : जोडभावीपेठ परिसरातील मुकुंदनगर येथे चाकू आणि काठीने केलेल्या मारहाणीत २५ वर्षीय महिला जखमी झाली. ही घटना रविवारी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास घडली. वर्षा राजपाल वाघमोडे (वय २५ रा. मुकुंदनगर, डिके यांच्या घराजवळ) असे जखमीचे नाव आहे. त्याांना उपचारासाठी विजया कांबळे (आई) यांनी पहाटे शासकीय रुग्णालयात दाखल केले. रात्रीच्या सुमारास त्यांना अज्ञात कारणावरून सोमनाथ गोसावी आणि ज्योती गोसावी या दोघांनी मारहाण केली, अशी नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

## तरुणास मारहाण करून पैसे लुटले; चौघांवर गुन्हा

सांगोला : चोरट्या वाळू खबर तहसीलदार यांना दिल्याच्या कारणावरून एका तरुणास काठ्याने मारहाण करून त्याच्या खिशातील रोकड पळवली. ही घटना सांगोला येथील माण नदी जवळ शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात सांगोल्याच्या पोलिसांनी धनाजी भाऊसाहेब जानकर, अंकुश रोडगे, सागर शेळके आणि गणेश पांढरे (सर्व रा. सावे सांगोला) अशा चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे .पप्पू शिवाजी इंगोले (वय ३०, रा. कोपटे वस्ती सांगोला) असे जखमीचे नाव आहे. काल सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास वरील चौघेजण एमएच१०-बीक्यू-७००५ या स्कार्पिओ मोटारीतून येथून कोपटे वस्ती येथे आले. आणि तू माझी वाळूची गाडी तहसीलदारांना पकडून देतो का? असे म्हणत चौघांनी त्यांना मारहाण केली.

### वर्गणीच्या कारणावरून मारहाण

सोलापूर : वर्गणी मागण्याच्या कारणावरून काठी आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून उचलून आपटल्याने जयभीम संगप्पा गायकवाड (वय ४८ रा.डोणगाव ता . उत्तर सोलापूर) हे जखमी झाले. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास त्यांच्या घराजवळ घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले . संतोष साबळे, प्रज्वल साबळे आणि अजय साबळे यांनी मारहाण केली अशी नोंद सलगरवस्ती पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तिकडे पाऊस झाला की ईकडे पाणी येणार!

कल्याण
900-94-167

मुंबई
289-94-680

# निवडणुकीच्या तोंडावर अजितदादांच्या अडचणीत वाढ

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडत अजितदादा यांनी आठ पाठीराखे आमदारांना सोबत घेवून महायुतीच्या सत्तेत प्रवेश केला. त्यांच्यासह सर्व आमदारांना भाजपच्या नेत्यांनी मंत्रीपदाची शपथ दिली.दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस आमचीच आहे,असा दावा अजितदादांकडून केला गेला. त्यानंतर हे प्रकरण निवडणूक आयोगात गेले.आयोगाने खरी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादांची असून त्यांना घड्याळ हे चिन्हही बहाल केल्यानंतर शरद पवारांच्या गटात मोठी खळबळ उडाली होती.

अजितदादा व त्यांच्या समर्थक आमदारांनी पक्ष शिस्तीचा भंग केला असून पक्षांतर बदी कायद्यानुसार त्या सर्वांना अपात्र ठरवण्याची याचिका शरद पवार गटाकडून सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली आहे.त्यावर सोमवारी सुनावणी झाली. या सुनावणी प्रकरणात महत्वाची घडामोड घडली. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी अजित पवार गटाला विचारलेला प्रश्न चर्चेत आला आहे. तुम्हाला अपात्र का ठरवू नये? असा सवाल न्या. चंद्रचूड यांनी केला आहे. ॲड. सिद्धार्थ शिंदे यांनी ही माहिती दिली. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात फूट पडल्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आहे.

## ▌अपात्र प्रकरणात सुप्रीम कोर्टाची टांगती तलवार

नवी दिल्ली/वृत्तसंस्था

**महाराष्ट्राती महायुतीच्या सरकारमधील उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अडचणीत वाढ होण्याची चिन्हे दिसत आहे.तुम्हाला अपात्र का ठरवू नये,असा सवाल सुप्रीम कोर्टाने विचारला असून यासंदर्भात उत्तर देण्यासाठी त्यांना चार आठवड्याची मुदत देण्यात आली आहे.विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हे प्रकरण बेंचवर आल्याने अजितदादांची दमछाक होवू शकते.**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्र प्रकरणाची सुनावणी सभापती राहुल नार्वेकर यांच्या समोर झाली त्यांनी अजितदादा गटाला पात्र ठरवले. या निर्णयाविरूद्ध शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सोमवारी या प्रकरणात कोर्टाने नोटीस जारी केली आहे. अजित पवार आणि ४१ आमदारांना ही नोटीस बजावली आहे. चार आठवड्यात या नोटिशीला उत्तर द्यायचे आहे. शिवसेनेचे जे आमदार अपात्रता प्रकरण आहे, त्याच्याबरोबरच हे प्रकरण घेतले जाईल असेही कोर्टाने म्हटले आहे.

३ सप्टेंबरला शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या आमदार अपात्रता प्रकरणांची सुनावणी एकापाठोपाठ घेतली जाईल, असे कोर्टाने म्हटले आहे. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी ३ सप्टेंबरला होणार आहे. त्यामुळे ३ सप्टेंबरलाच हे मॅटर ऐकलं जाईल, अशी चिन्हे आहेत. तोपर्यंत अजित पवार गटाने उत्तर द्यायचे आहे.

भरत गोगावले हे राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात गेले आहेत. त्यांनी तातडीने ही तारीख ६ ऑगस्टला घेतली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने जर लवकर सुनावणी घेण्याची विनंती केली तर हे प्रकरण लवकर घेतले जाऊ शकते. ३ सप्टेंबरला जर सुनावणी झाली तर सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत या प्रकरणाचा निकाल येऊ शकतो.



CMYK